प्रतिष्ठेत,

प्रिय ----------------------------------

आणि ----------------------------------

(येथे विद्यार्थ्यांनी आपल्या पालकांची नावे, आई आणि वडील दोहोंची नावे लिहून हा अंक त्यांना वाचावयास देणे.. वाचून दाखविणे.)

लेंड-अ-हँड इंडिया

# कृतीशील संवाद

शैक्षणिक वर्ष २०१४-१५ ● मार्च २०१५

(फक्त खाजगी वितरणासाठी)

Lend-A-Hand India

## मनोगत

## व्यवसाय शिक्षणात येऊ घातलेले बदल

**सुनंदा माने** (कार्यकारी संचालिका, लेंड-अ-हँड इंडिया, पुणे)

चालू शालेय वर्षातील मार्च-एप्रिल हे शेवटचे महिने. परीक्षेनंतर विद्यार्थी सुट्टीवर जातील व शिक्षकवृंद परीक्षांचे निकाल, पुढील वर्षाची तयारी, नवीन ॲडमिशन या कामांत व्यस्त होतील. लाहीमध्ये आम्हीदेखील नवीन शाळांची उपक्रमासाठी निवड, निदेशकांचे प्रशिक्षण, शासनाने नव्या वर्षात सुरु करण्याचे ठरविलेल्या ३५० सरकारी शाळांपैकी १४० शाळांमध्ये मल्टी-स्किल फौंडेशन कोर्स (MFSC-IBT) उपक्रमाची सुरुवात करण्याची तयारी यांत व्यस्त राहू. हे सगळे होत असताना सर्वांनीच थोडी विश्रांती जरूर घेऊन, घरातील लोकांना वेळ देऊन, पुढील वर्षाची जोमाने सुरुवात करण्यास तयार राहूयात.

येत्या एक-दोन वर्षांत माध्यमिक शाळांतील व्यवसाय शिक्षण संदर्भात येऊ घातलेल्या काही बदलांबद्दल येथे थोडा उहापोह करावा असे वाटते. गेले ७/८ वर्षे आपण सर्व मल्टी-स्किल अभ्यासक्रम (आय.बी.टी. / व्ही१) माध्यमिक शाळांमध्ये सुरु व्हावा व तो टिकून राहावा यासाठी प्रयत्नशील आहोत. सर्व घटकांच्या (संस्था, मुख्याध्यापक, समन्वयक, निदेशक, शाळेचा स्टाफ व पालक) 'मेहनतीमुळे आज हा उपक्रम २०१४ पर्यंत ८,००० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी पूर्ण केला आहे. याचेच फळ म्हणून हा अभ्यासक्रम आता देशाच्या स्तरावरही मान्य झाला आहे व त्याची सुरुवात म्हणून महाराष्ट्रातील निवडक ३५० सरकारी शाळांपैकी १४० शाळांमध्ये तो २०१५-१६ मध्ये सुरु होणार आहे. कालांतराने तो सर्व शाळांमध्ये पोहोचेल यात शंका नाही. अर्थात यासाठी आपणा सर्वांनाच थोडी तयारी करावी लागेल.

सध्या ज्या शाळा व्ही१ उपक्रम राबवतात त्यांना National Skills Qualification Framework (NSQF) च्या नव्या आकृतीबंधात बसण्यासाठी काही कालावधीची मुदत वाढ द्यावी यासाठी लाही प्रयत्नशील आहे. तसेच जास्तीत जास्त निदेशकांनाही नव्या आकृतीबंधात सामावून घेण्यासाठी काय उपाय योजना करता येतील याचाही विचार लाही करत आहे. सिनीअर निदेशकांना RPL (Recognition of Prior Learning) अंतर्गत परीक्षा देऊन पात्रता मिळवता येईल का, हा विचार करीत आहोत. यंदाच्या सिनिअर निदेशकांच्या वार्षिक संमेलनात यावर अधिक माहिती व विचार विनिमय होऊ शकेल.

या वर्षी आपण कृतीशील संवाद मासिक स्वरुपात सुरु केले. या शैक्षणिक वर्षातील हा ७वा व शेवटचा अंक. अंक सुरु करण्यामागील मूळ कल्पना शाळेशी संवाद, कल्पना, विचार, शाळेत होणारे विविध उपक्रम, प्रयोग संशोधन यांची देवाण-घेवाण हा तर होताच पण त्याच बरोबर शाळेतील आय.बी.टी./व्ही१ उपक्रम पालकांपर्यंतपण पोहोचावा हादेखील प्रमुख उद्देश होता. त्यानुसार प्रत्येक विद्यार्थ्याला एक प्रत मिळावी एवढ्या प्रती लाही रजिस्टर पोस्टाने शाळेस पाठवित आहे. अंकावर लिहिलेल्या सूचनांप्रमाणे प्रत्येक विद्यार्थ्याला आणि त्यांच्या पालकांना अंक मिळत असेलच. पालकांची शाळेतील उपक्रमाबद्दल जाण व सहभाग सर्वांच्याच दृष्टीने महत्वाचा आहे, हे आपण जाणताच. दहावीनंतर विद्यार्थ्याने आय.बी.टी. / व्ही१ चा फायदा घेऊन तांत्रिक / विज्ञान विषयांकडे वळावे व स्वतःची प्रगती साधावी तसेच शाळेचे नाव पुढे आणावे हेही यामुळे शक्य आहे.

धन्यवाद, पुढील वर्षी जूनमध्ये परत 'कृतीशील संवाद' मधून भेटूयात !

## स्काईप व्हिडिओ कॉल : गोवंडी ते न्यूयॉर्क



अमेरिकेतील समारंभात उपस्थितांशी स्काईप व्हिडिओ कॉल यंत्रणेद्वारे गोवंडी, मुंबईतील विद्यार्थ्यांचा संवाद

आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्ताने लाहीद्वारा एक विशेष उपक्रम घेण्यात आला.

लाहीच्या अमेरिकन टीमने न्यूयॉर्क मध्ये भारतीय वकीलातीमध्ये एक विशेष कार्यक्रम आयोजित केला होता. तसेच लाहीच्या मुंबई येथील टीमने परस्पर समन्वय साधून गोवंडी येथील राधीबाई सोभराज टहिलियानी माध्यमिक विद्यालयात मल्टी-स्किल अभ्यासक्रम (व्ही१) शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचा आणि अमेरिकेतील समारंभात उपस्थितांशी स्काईप व्हिडिओ कॉल यंत्रणेद्वारे एकाचवेळी संवाद साधला. अमेरिकन वेळेप्रमाणे ९ मार्च, संध्याकाळी ७.३० वाजता हा कार्यक्रम तेथे आयोजिण्यात आला होता तर भारतीय प्रमाण वेळेनुसार १० मार्च, सकाळी ५.०० वाजता गोवंडी येथे विद्यार्थी संवाद साधत होते!

'शिक्षण व सशक्तीकरण : महिला आणि समाज' असे या कार्यक्रमाचे स्वरूप होते.

डॉ. मनोज मोहपात्रा (भारतीय राजदूत), श्री. विजय नांबियार (सेक्रेटरी जनरल ऑफ युनायटेड नेशन्स- म्यानमार विषयक विशेष सल्लागार), श्री. मायकल पोलाक (संस्थापक आणि अध्यक्ष -SCA फौंडेशन), डॉ. समीन शर्मा, श्री. जुलियस वूल, श्री. विक्रम अटल (लाहीच्या कार्यकारी मंडळावरील सल्लागार सदस्य) तसेच प्रमुख व्यावसायिक, न्यूयॉर्क महापौरांच्या कार्यालयातील वरिष्ठ अधिकारी आणि इतर सुप्रसिद्ध मान्यवर न्यूयार्क येथे उपस्थित होते.

शाळेतील रितेश चौधरी, चेतन पांचाल, विद्या माने, मृणाली सोनावणे या मराठी माध्यमातील चार विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली होती. त्यांना सदर कार्यक्रमात बोलण्यासाठी इंग्रजी संभाषणाचे विशेष प्रशिक्षण देण्यात आले होते. शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती संध्या ठाकूर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

चारही विद्यार्थ्यांनी कसून तयारी केली आणि उत्तम प्रतिसाद दिला.

स्काईप व्हिडिओ कॉल यंत्रणेद्वारे साधण्यात आलेला संवाद सर्वच उपस्थितांना भावला.

## जागतिक कौशल्य स्पर्धा २०१५, ब्राझील

World Skills Competition (जागतिक कौशल्य स्पर्धा) ही दर दोन वर्षांनी तरुणांसाठी होणारी जगातील सर्वात मोठी आंतरराष्ट्रीय 'व्यावसायिक कौशल्य स्पर्धा' आहे. १७ ते २२ या वयोगटातील तब्बल १,००० तरुण वेल्डिंग पासून ते वेब-डिझाईन पर्यंत अनेकानेक क्षेत्रातील विविध कौशल्यांचे आणि विकसित तंत्रज्ञानाचे प्रदर्शन करतात. सदर स्पर्धा International Vocation Training Organisation (IVTO) या संस्थेद्वारा आयोजित केली जाते. सर्वसाधारणपणे यात सहा विभाग असतात - वाहतूक आणि पुरवठा, बांधकाम आणि बांधकाम तंत्रज्ञान, उत्पादन आणि अभियांत्रिकी तंत्रज्ञान, आयसीटी (माहिती व संपर्क) तंत्रज्ञान, क्रिएटिव्ह आर्ट आणि फॅशन, सामाजिक तसेच वैयक्तिक सेवा.

२०१५ ची स्पर्धा ऑगस्ट महिन्यात ब्राझील देशामध्ये साओ पावलो यथे होणार आहे. भारतामध्ये या स्पर्धेची जबाबदारी NSDC ने घेतली आहे.

अधिक माहितीसाठी भेट द्या - www.worldskills.org आणि www.worldskillssaopaulo2015.com

# यशोगाथा : शशिकांत सानप

कृतीशील संवादच्या फेब्रुवारी अंकात लेंड–अ–हँड इंडिया विनाव्याजी कर्जाऊ शिष्यवृत्ती योजनेविषयी माहिती देण्यात आली होती. सदर योजनेचा लाभ अनेक विद्यार्थी–विद्यार्थिनींनी घेतला आहे.शिष्यवृत्तीमुळे त्यांना त्यांचे शिक्षण पूर्ण करता आले आहे. शिष्यवृत्ती मिळालेल्यांत शशिकांत दत्तू सानप हा एक विद्यार्थी होय.


शशिकांत हा आय.बी.टी.चा माजी विद्यार्थी आता सरकारी आय.टी.आय. मध्ये शेवटच्या वर्षाला असून अखेरच्या सत्रामध्ये शिकत आहे. त्याची कहाणी आवर्जून जाणून घेण्याजोगी आहे.

शशिकांत सानप हा नाशिक जिल्ह्यातील सिन्नर तालुक्यामधील निमगाव या गावचा आहे. तेथेच त्याचे सातवीपर्यंतचे शिक्षण झाले. पुढील शिक्षणासाठी तो जेव्हा बारगांव पिंपरी येथील न्यू इंग्लिश स्कूल मध्ये प्रवेशासाठी गेला तेव्हा कॉम्प्यूटर किंवा आय.बी.टी. असा पर्याय निवडण्यास सांगितले. आय.बी.टी.च्या तुलनेत कॉम्प्यूटर कोर्सची फी खूपच कमी होती आणि आय.बी.टी. म्हणजे नेमके काय ते त्याला तसेच त्याच्या वडिलांनाही ठाऊक नव्हते. पण चौकशीअंती त्याने आय.बी.टी.ला प्रवेश घेतला.

न्यू इंग्लिश स्कूल मधील निदेशक उगले सरांनी त्याला खूप मदत केली. आठवी, नववी आणि दहावी अशी तीन वर्षे त्याने येथे आय.बी.टी.चे सर्व प्रशिक्षण घेतले. प्रत्यक्ष कृतीतून शिकण्याची प्रक्रिया त्याला खूप आवडली. याच शाळेत एका टोकाकडून दुसरीकडे धान्य न्यावे लागत असे, त्यासाठी खूप कष्टही पडत. ते बघून शशिकांत आणि त्याच्या बरोबरच्या विद्यार्थ्यांनी बेअरिंग बसविलेला गीयरचा गाडा बनविला. हा गाडा सहज पुढे सरकत असे आणि त्यातून धान्य नेणे खूप सोप्पे व कमी कष्टाचे झाले.

दहावीची परीक्षा दिल्या नंतरच्या सुट्टीमध्ये शशिकांतने सिन्नर मधील दोन बंगल्यांचे कंसिल्ड वायरिंगचे काम केले.

दहावीच्या परीक्षेत त्याला ६७% तर आय.बी.टी. मध्ये ८१ मार्क मिळाले.



**शशिकांत सानप**

दहावी नंतर त्याने येवला तालुक्यातील बाभूळगांव येथील एस.एन.डी. पॉलीटेक्निक मध्ये मेकॅनिकच्या तीन वर्षांच्या डिप्लोमासाठी प्रवेश घेतला. मात्र त्याच्या घरची आर्थिक परिस्थिती पुढील शिक्षणाचा खर्च पेलण्याइतकी सक्षम नव्हती. घरची थोडी शेती होती पण त्या भागात सातत्याने पडणाऱ्या दुष्काळामुळे त्यातून फारसे उत्पन्न येत नव्हते. अशावेळी त्याला त्याच्या शाळेतील निदेशकांनी लेंड–अ–हँड इंडियाद्वारा दिल्या जाणाऱ्या विनाव्याजी कर्जाऊ शिष्यवृत्ती योजनेविषयी सांगितले. शशिकांतने सदर शिष्यवृत्तीसाठी अर्ज केला आणि त्याची निवडही झाली. गेली तीन वर्षे त्याला लेंड–अ–हँड इंडियाद्वारा आर्थिक मदत केली जात आहे. (पहिल्या वर्षी : रु.३२,५००/–, दुसऱ्या आणि तिसऱ्या वर्षी : प्रत्येकी रु. ४०,०००/–). या आर्थिक मदतीतून त्याला परगावी राहणे, मेस, शिक्षण आदी बाबींवरील खर्चासाठी बहुमोल मदत झाली.

डिप्लोमा करीत असताना त्याने अलीकडेच एक प्रोजेक्ट केला ज्याचे सर्वांनी कौतुक केले असून तो आता त्याचे पेटंटही घेत आहे.

आता शशिकांतचे डिप्लोमा शिक्षण पूर्ण होत आले आहे. शालेय स्तरावर आय.बी.टी.चे प्रशिक्षण घेतल्याचा त्याला पुढे खूप उपयोग झाला. यापुढेही तो पदवीचे शिक्षण घेणार आहे. मात्र आता पावेतो घेतलेल्या शिक्षणाच्या बळावर तो नोकरी देखील करणार आहे आणि पुढील शिक्षणही चालू ठेवणार आहे.

शशिकांतला लेंड–अ–हँड इंडियाच्या शुभेच्छा!

# कमवा आणि शिका (Earn While You Learn)

विद्यार्थी मित्रांनो,

आपण सारे I.B.T. अथवा जीवन कौशल्य अभ्यासक्रम (व्ही–१) शिकतो आहोत ते प्रामुख्याने विविध जीवनोपयोगी कौशल्ये आत्मसात करण्यासाठी आणि तेही फक्त पुस्तकातून नव्हे तर प्रत्यक्ष कृतीतून आपण शिकत आहोत. निव्वळ नोकरी मिळविणे हा शालेय अभ्यासाचा उद्देश असता कामा नये तर छोटे का होईना पण व्यावसायिक बनविणे (स्वयं–रोजगार क्षमता असणे) हा आपल्या I.B.T. चा हेतू आहे. चला तर मग त्यादृष्टीने आता परीक्षेनंतरच्या सुट्टीचा कालावधी आपण अधिक फलदायी करूयात.

तुम्ही स्वतः किंवा तुमचे मित्र, भाऊ–बहिण यांच्यासोबत बिन–भांडवलाचे अथवा अगदी जुजबी भांडवलातून छोटेखानी व्यवसाय करू शकता.

आपण आपला थोडा फार खर्च स्वत: भागविला तर तुम्हाला व तुमच्या पालकांना याचा फार आनंद होईल. तर मग शिकता शिकता कमविण्यासाठी काय करता येईल विचार करा. फावल्या वेळात पाककृती, शिवणकाम, न्हावीकाम ब्युटीपार्लर, बागकाम यांपैकी किंवा इतर अनेक कामे शिकता येतील. थोडक्यात तुम्हाला आवडेल असे कौशल्य (Skill) विकसित करा. त्यावर आधारित उद्योग उन्हाळ्याच्या / दिवाळीच्या सुट्टीत करता येईल का याचा विचार करा.

उदाहरणार्थ –

- ✓ उन्हाळ्यात तुम्ही थंडगार लिंबू /आवळा सरबत अथवा पन्हे करून विकू शकता.
- ✓ आंवला कैंडी बनवून विकू शकता.
- ✓ एखाद्या घरी बागकामाचे काम मिळवू शकता.
- ✓ उन्हाळा म्हणजे लग्नसराईचा मौसम, तुम्ही विविध प्रकारच्या शोभेच्या वस्तू (तोरण, कागदी फुले, वॉल–पीस, भरतकाम केलेला टेबल क्लॉथ, आदी) बनवून भेट देण्यासाठी म्हणून लोकांना विकू शकता.
- ✓ दिवाळीच्या आधी आकाशकंदील बनवून विकू शकता.

परंतु कुठलाही उद्योग करताना जमा खर्चाचा हिशेब ठेवणे आवश्यक आहे, हे लक्षात ठेवा. उद्योग सुरु करायला लागणारे भांडवल कसे उभे करायचे याचा विचार करा. पालकांकडून / नातेवाईकांकडून असे भांडवल उसने घेऊ शकता. उद्योग कोणत्या वेळात, किती कालावधी साठी, कशाप्रकारे चालवायचा हे ठरवा. उद्योगासाठी लागणारे साहित्य कमी खर्चात कुठून मिळवायचे याचा विचार करा.

बघा तरी, उद्योग करून पहिले उत्पन्न मिळविण्यात किती मजा येतो!

## उंची आणि वजन यांचे योग्य प्रमाण

स्वतःचे वजन किती असावे ?

समजा तुमची उंची ५ फूट ४ इंच आहे. तर आधी या उंचीला सेंटीमीटर मध्ये करून घेऊ.

१ फुट = ३० सेमी, आणि १ इंच = २.५ सेमी

५ फुट = ३० X ५ = १५० सेमी

४ इंच = २.५ X ४ = १०.० सेमी

म्हणून : ५ फुट ४ इंच = १५० + १० = १६० सेमी.

वजन = १६० – १०० = ६० किलो

म्हणजे जर तुमची उंची ५ फुट ४ इंच असेल तर तुमचे वजन ६० किलो असले पाहिजे.

तर चला तर मग, तुम्ही तुमच्या शाळेमध्ये किंवा डॉक्टरकडे जाऊन स्वतःचे वजन व उंची तपासा आणि वर दिल्याप्रमाणे तुमचे वजन कमी आहे कि जास्त हे पहा.

वजन कमी असेल तर काय कराल ?

जर उंचीच्या हिशोबात वजन कमी असेल तर समतोल आहार आणि पाणी घेणे आवश्यक आहे.

# वाचाल तर वाचाल

विद्यार्थी मित्रांनो,

आजकाल करमणूकीच्या साधनांचा अतिरेक झाला आहे. याचा परिणाम वाचन कमी होण्यात होत आहे. पण पुस्तकांचे महत्व वादातीत आहे.

आपण आय.बी.टी. मध्ये प्रत्यक्ष कृती करून शिकतो, त्याचे फायदे आहेतच. पण त्याचबरोबर आपण हेही लक्षात ठेवले पाहिजे की वाचनाचे देखील खूप फायदे असतात. अनेकानेक गोष्टी सहजपणे समजतात. विविध बाबींचा आपण वाचनाद्वारे अनुभव घेऊ शकतो. वाचनामुळे आपण स्वतःला घडवू शकतो.

वार्षिक परीक्षेनंतरच्या सुट्टीमध्ये तुम्ही विविध पुस्तके वाचून स्वतःचे ज्ञान वाढवू शकता तसेच मनोरंजनही करून घेऊ शकता.

पुढे दिलेली काही निवडक पुस्तकांची यादी देत आहोत, तुमच्या शाळेतील अथवा गावातील वाचनालयात जाऊन तुम्ही ती अवश्य वाचावीत आणि मित्रांसोबत, भाऊ–बहिण यांसमवेत त्यांवर चर्चा करावी–

१. वाचू आनंदे –कुमार गट : भाग एक (माधुरी पुरंदरे आणि नंदिता वागळे)
२. वाचू आनंदे –कुमार गट : भाग दोन(माधुरी पुरंदरे आणि नंदिता वागळे)
३. खरेखुरे आयडॉल्स : भाग १ (समकालीन प्रकाशन)
४. खरेखुरे आयडॉल्स : भाग २ (समकालीन प्रकाशन)
५. A to Z विज्ञान (डी.एस. इटोकर)
६. वयात येताना (मंगला गोडबोले, डॉ. वैजयंती खानविलकर)
७. एक होता कार्व्हर (वीणा गवाणकर)
८. तोत्तोचान (तेत्सुको कुरोयानागी, मराठी अनुवाद – चेतना सरदेशमुख गोसावी)
९. गोष्टी माणसांच्या (सुधा मूर्ती, मराठी अनुवाद – लीना सोहोनी)
१०. गांधीजी (पु. ल. देशपांडे)
११. अखंड प्रेरणा गांधी विचारांची (रघुनाथ माशेलकर)
१२. शिवाजी कोण होता? (गोविंद पानसरे)
१३. आंबेडकर (नलिनी पंडित)
१४. प्रकाशवाटा (प्रकाश आमटे)
१५. सभेत कसे बोलावे (माधव गडकरी)
१६. पक्षी आपले शेजारी (किरण पुरंदरे)
१७. दैनंदिन पर्यावरण (दिलीप कुलकर्णी)
१८. विज्ञानाचा रंजक शोध (विनय र. र.)
१९. वनवास (प्रकाश नारायण संत)
२०. पंखा (प्रकाश नारायण संत)
२१. पाडस (मार्जोरी किनन रॉलिंग्ज, मराठी अनुवाद – राम पटवर्धन)
२२. उपरा (लक्ष्मण माने)
२३. बलुतं (दया पवार)
२४. आयदान (उर्मिला पवार)
२५. पॅपिलॉन (मराठी अनुवाद – रवींद्र गुर्जर)



**National Skill Qualification Framework (NSQF)** पथदर्शक प्रकल्प म्हणून भारतातील काही राज्यांत (उदा. हरयाणा, हिमाचल प्रदेश, आसाम, कर्नाटक, महाराष्ट्र) सुरु झाले आहे. यारचनेचा फायदा (देश पातळीवर कोर्सला मान्यता, १ ते २० पातळ्यांमधून माध्यमिक शिक्षणापासून डॉक्टरेट पर्यंत शिकण्याची उपलब्धता, कोर्स पूर्ण करणाऱ्या, विद्यार्थ्यांना काही प्रमाणात आर्थिक मदत विचाराधीन, इत्यादी) पूर्वव्यावसायिक अभ्यासक्रम (व्ही१) चालवणाऱ्या शाळाही घेऊ शकतील. शासनाकडून या बाबतीत लवकरच सध्याच्या शाळा या नव्या NSQF रचनेचा फायदा कसा घेऊ शकतील या बद्दल माहिती उपलब्ध होईल. लेंड–अ–हँड इंडियाद्वारा शासनास अशी विनंती करण्यात आली आहे की सध्याच्या शाळांना या बदलासाठी थोडी मुदत द्यावी म्हणजे जास्तीत जास्त शाळा त्याचा फायदा घेऊ शकतील.

# विवेक माध्यमिक विद्यालय, मांडवा, जिल्हा वर्धा येथे बुनियादी शिक्षण पद्धतीची अंमलबजावणी

**विवेक माध्यमिक विद्यालय, मांडवा, जिल्हा वर्धा येथे गेली पाच वर्षे IBT उपक्रम राबविण्यात येत आहे. तेथील समन्वयक श्री. किशोर उमाटे यांनी नुकतेच 'कृतीशील संवाद' मासिकासाठी IBT अभ्यासक्रम राबविताना आलेले अनुभव विस्तृतपणे कळविले, त्यातील संपादीत भाग येथे देत आहोत–**

'स्वानुभव हा सर्वोत्तम शिक्षक आहे', हे आपल्या सर्वांना माहितच आहे. विद्यार्थ्यांना कृतीयुक्त शिक्षण मिळाले पाहिजे, अनुभवातून त्याने शिकले पाहिजे.. जेणे करून ते त्याच्या निरंतर लक्षात राहील; असे सर्व शिक्षणतज्ञ सांगतात. परंतु त्याची अंमलबजावणी करण्याचे काम 'लेंड–अ–हँड इंडिया' पुरस्कृत मुलभूत तंत्रज्ञानाची ओळख (व्ही–१) या पूर्व–व्यावसायिक अभ्यासक्रमाद्वारे केले आहे.

या अभ्यासक्रमाची सुरुवात आमच्या शाळेत शैक्षणिक वर्ष २०१०–११ मध्ये झाली. सुरुवातीला अभ्यासक्रमाची पुरेशी पूर्वकल्पना नसताना सुरु झालेला हा अभ्यासक्रम विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक उत्क्रांतीला नवी दिशा देणारा ठरू शकतो याची कल्पना येऊ लागली. महात्मा गांधी यांच्या बुनियादी शिक्षण पद्धतीशी साम्यता साधून आहे, हे लक्षात आले. शैक्षणिक वर्ष २०१२–१३ मध्ये इयत्ता १०वीच्या पहिल्या बॅचची प्रात्यक्षिक परीक्षा घेण्याची वेळ आली. वर्धा जिल्ह्यातून व्ही–१ अभ्यासक्रम राबविणारी आमची एकमेव शाळा असल्यामुळे शासकीय तंत्र विद्यालय, वर्धा यांना शाळेची प्रात्यक्षिक परीक्षा कशी घ्यावी याची कल्पना नव्हती. त्यांनी त्यांच्या इथे सदर परीक्षा आयोजित केली. मात्र आमच्या शाळेत जवळ–जवळ चार–पाच गावातील विद्यार्थी येत असतात. एवढ्या विद्यार्थ्यांना जिल्ह्याच्या ठिकाणी नेऊन प्रात्यक्षिक परीक्षा देणे आमच्यासाठी जिकीरीचे काम होते. परंतु वर्ध्याचे जिल्हा व्यावसायिक शिक्षणाधिकारी श्री. भोयर यांनी बाह्य परीक्षक पाठवून त्यांच्या मार्फत प्रात्यक्षिक परीक्षा रीतसर पार पाडली. त्याच्या पुढील वर्षी शालांत परीक्षा मंडळाकडून परिपत्रक आले की, सर्व प्रात्यक्षिक परीक्षा शाळेच्या स्तरावर आयोजित करा. परंतु आम्ही सर्वांनी मिळून ठरविले की या क्षेत्रातील जाणकार लोकांना बाह्य परीक्षक म्हणून शाळेत बोलवावे जेणे करून त्यांच्या ज्ञानाचा आपल्याला उपयोग होईल, आपला चालू असलेला उपक्रम जिल्यातील इतर लोकांना माहिती पडेल. त्यानुसार दरवर्षी विविध तंत्र कुशल मान्यवरांना बोलावत आहोत. काळाची गरज असलेला अभ्यासक्रम असे गौरवोद्गार सर्वांनी काढले.

इयत्ता १०वी मध्ये IBT अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांची टक्केवारी वाढलेली दिसते. पाठांतरावर आधारित शिक्षणापेक्षा समजून–उमजून शिक्षण घेऊन बाहेर पडलेले विद्यार्थी जास्त डोळस, चौकसपणे विचार करणारे, स्वतःची आवड ओळखून करिअरचा विचार करणारे आढळत आहेत. महत्वाचे म्हणजे नोकरीपेक्षा आपला स्वतःचा व्यवसाय, घराच्या शेतीकडे लक्ष देणे याकडे कल वाढत आहे.

IBT अभ्यासक्रमातील 'गृह व आरोग्य' विभागातील प्रात्यक्षिके करताना मुले–मुली हा भेदाभेद विसरून सर्वजण एकत्र कामे करतात. याची फलश्रुती म्हणजे जवळ–जवळ १०% विद्यार्थ्यांनी कॅटरिंग व्यवसाय निवडण्याचे निश्चित केले आहे.

अभियांत्रिकी विभागातर्फे मागील वर्षी शाळेमध्ये मुलींसाठी स्वतंत्र शौचालयाचे बांधकाम विद्यार्थ्यांनी स्वतः केले आहे. त्यामुळे 'अरे हे काम काही कठीण नाही!' असा आत्मविश्वास विद्यार्थ्यांमध्ये जागृत होत आहे.

यावर्षी आम्ही सर्व विभागांना सामावून घेणारा प्रकल्प म्हणजे गांडूळ खत निर्मिती घेतला.

IBT चे सर्व कार्य शाळेचे मुख्याध्यापक श्री. नारायण पवार, संस्थेचे उपाध्यक्ष श्री. सुनील गायकवाड यांच्या मार्गदर्शनात सुरु असते. मला येथे नमूद करताना आनंद होत आहे की IBT अभ्यासक्रम फक्त याच विभागापुरता मर्यादित न राहता शाळेतील इतर शिक्षकवृंद सक्रीय सहभागी होतो. IBT चे निदेशक श्री. पुरुषोत्तम देशमुख (शेती व पशुपालन), श्री. दिनेश ठाकरे (ऊर्जा व पर्यावरण), श्री. आशिष लादे (अभियांत्रिकी), श्रीमती सुनिता ठाकरे (गृह व आरोग्य) यांच्या योगदानाने IBT अभ्यासक्रमाची वाटचाल जोमाने सुरु आहे. समन्वयक म्हणून मी या सर्वांचा ऋणी आहे.

**– श्री. किशोर उमाटे**

**(इतर शाळा, तेथील समन्वयक, निदेशक, मुख्याध्यापक या सर्वांनीदेखील त्यांचे अनुभव आम्हाला कळवावेत ही विनंती, त्यास यथोचित प्रसिद्धी देण्यात येईल – संपादक).**



**गांडूळ खत निर्मिती प्रकल्प**

# अंबवडे येथील भूतेश्वर विद्यामंदिर शाळेतील I.B.T. कार्यशाळेचे उद्घाटन

महाराष्ट्र राज्यातील सातारा जिल्ह्यातील अंबवडे येथील भूतेश्वर विद्यामंदिर शाळा, मायणी भाग शिक्षण प्रसारक मंडळ ही संस्था चालवते.

संस्थेचे संचालक श्री. कुबेर सरांनी हे कार्य त्यांच्या वयाच्या १८ वर्षा पासून सुरु केलेले आहे. I.B.T. कार्यशाळेच्या उद्घाटना सोबतच इयत्ता १० वीच्या विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी शुभेच्छा व समारोपाचा पण कार्यक्रम आखलेला होता. शाळेत एक आगळी वेगळी पण उल्लेखनीय संकल्पना राबविली जाते, इयत्ता १० तील विद्यार्थी शाळेबद्दलचे मनोगत लिहून देतात, शाळा त्या सगळ्या लेखनाचे एक पुस्तक स्वरूपात रुपांतर करून प्रदर्शित करते. प्रत्येक वर्षीचे पुस्तक शाळेतील ग्रंथालयात वाचायला मिळते.

या शाळेतील I.B.T. च्या कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी अंबवडे येथील ग्रामस्थ व अन्य मान्यवरपण उपस्थित होते. कार्यशाळेत सगळ्या साधनांची मांडणी अतिशय सुरेख पद्धतीने केलेली आहे.



**प्रकल्पाची माहिती देताना विद्यार्थीनी**

कार्यशाळा पाहणी करताना , निरीक्षक आणि विद्यार्थ्यांनी सगळ्यांना विषयाची माहिती दिली. काही प्रात्यक्षिकेपण करून दाखवली. प्रकल्पाची माहिती विद्यार्थ्यांनी श्री. कुबेर सर, ग्रामस्थ व उपस्थित लोकांना एकरूप होऊन समजाऊन सांगितली.

## निदेशकांसाठी टिप्स

आता शैक्षणिक वर्ष संपत आले आहे. पुढील संपूर्ण वर्षात आपल्याला जीवन कौशल्य अभ्यासक्रम अधिक परिणामकारकरित्या राबवायचा आहे. त्यासाठी निदेशक (तसेच समन्वयक) यांसाठी (आत्तापासूनच) काही टिप्स देत आहोत –

- ✓ शैक्षणिक वर्षाच्या अखेरीसच व्ही–१ (आय.बी.टी.) विभागासाठी आवश्यक असणाऱ्या उपलब्ध सर्व साहित्याची यादी करून त्याची पडताळणी करावी, यामुळे शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीस वेळेवर वर्गांची सुरुवात करता येईल.
- ✓ व्ही१ कोर्स अंतर्गत घ्यावयाच्या प्रात्यक्षिकांचे वार्षिक नियोजन करावे आणि त्यानुसार प्रत्येक महिन्याचे नियोजन मुख्याध्यापकांकडे सादर करावे.
- ✓ प्रात्यक्षिकांसाठी लागणाऱ्या सर्व कच्च्या मालाची यादी तयार करून व्ही१ कोर्सच्या संबंधित व्यक्तीला देणे आणि कच्चा माल मिळेपर्यंत पाठपुरावा करणे
- ✓ प्रात्यक्षिकाच्या ठिकाणी सुसूत्रता असावी – साहित्याची व्यवस्थित मांडणी, सुरक्षितेची काळजी, पोस्टर्स, प्रवाह आकृती, इ.
- ✓ निदेशकांनी विभागामध्ये प्रात्यक्षिकासाठी जाताना पूर्ण तयारीने आणि व्यवस्थित टापटीप जाणे. (लेंड–अ–हॅंड इंडिया द्वारा दिला गेलेला ओव्हर कोट घालावा)
- ✓ दैनंदिन हजेरी व नोंदवही ज्यादिवशी प्रात्यक्षिक झाले आहे त्याचवेळी पूर्ण करावे
- ✓ सर्व विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिक करू देणे
- ✓ प्रात्यक्षिकासाठी वापरलेले सर्व साहित्य व कच्चा माल स्वच्छ करून ठेवणे
- ✓ प्रत्येक महिन्यातील प्रात्यक्षिकांचा अहवाल समन्वयकाकडे सादर करणे
- ✓ प्रत्येक महिन्यातील समाज–उपयोगी कामांचा (कम्युनिटी वर्क) सविस्तर अहवाल समन्वयकाकडे सादर करणे
- ✓ दहावीच्या व्ही१ कोर्स प्रकल्पांची यादी आणि त्याचे वार्षिक नियोजन शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीस जून–जुलै महिन्यातच करावे.

# क..रि..अररर !

'क्या करे.. क्या ना करे.. ये कैसी मुश्किल हाय!' करिअर निवडताना अशी अवस्था तमाम विद्यार्थ्यांची बऱ्याचदा असते. करिअर ठरवणे, क्षेत्र निवडणे, त्या क्षेत्रात शिक्षण घेणे वा त्यातलीच नोकरी शोधणे!,.... हे सगळे तसे साधे व सोप्पे होऊ शकते पण त्यासाठीची प्रक्रिया टप्प्या–टप्प्याने पूर्ण करायला हवी :–

**आपल्याला काय करायला आवडतं ?**

अनेक वेळा हे चित्र पहायला मिळते की मी अमुक क्षेत्र निवडले कारण माझा मित्र / मैत्रिण / दादा / ताई / वडील / इत्यादी त्या क्षेत्रातले आहेत. असे न करता, आपल्याला स्वतःला कोणत्या गोष्टी करताना आनंद होतो याची यादी करा. उदाहरणार्थ, लोकांशी संवाद साधायला आवडतो, गाडी चालवायला आवडते, नृत्य करायला आवडते, प्राण्यांची काळजी घ्यायला आवडते, इत्यादी. यादी तयार करताना इतर कुणाचाही दबाव वा टेंशन न घेता, जे जे प्रामाणिकपणे 'आपल्याला आवडते' तेच नमूद करा.

**क्षेत्र सापडले की अनेक पर्याय समोर येतात**

वरील ॲक्टिव्हिटीमुळे आपल्याला आवडणाऱ्या क्षेत्राबद्दल कळू शकेल. त्यानंतर त्यातील विविध पर्यायांची यादी करा. उदाहरणार्थ, जर आपण इंजीनिअरिंग क्षेत्र निवडले तर प्रोडक्शन मैनेजर, ट्रेनर, इंजीनिअरिंग प्रोफेसर इत्यादी अनेक पर्याय मिळतात.

**निवडलेल्या क्षेत्रात उपलब्ध असलेल्या शैक्षणिक कोर्सची माहिती घ्या**

ग्रंथालय, इंटरनेट आणि प्रत्यक्ष लोकांशी संवाद या मार्गाने अनेक कोर्सेसची व पदव्यांची माहिती मिळवता येते. त्यातही आपल्याला कोणत्या विषयात अधिक खोलवर अभ्यास करायची आवड व गरज आहे ते ठरवा. यामुळे गरज व आवड नसलेल्या विषयात वेळ व ऊर्जा वाया जात नाही.

**चर्चा करा !**

आपल्या निवडलेल्या क्षेत्रात कार्यरत असलेल्या लोकांशी संवाद साधून त्यांची मते नोंदवून ठेवा व स्वतः त्या यादीतील पर्यायांचा विचार करुन आपले स्वतःचे एक मत तयार करा. अशा लोकांना व आपल्या कार्यक्षेत्राला भेट दिल्याने, आपल्याला 'प्रत्यक्ष काम कसे असते' याचा फिल येतो.

**इतक्या संशोधनानंतर मग कोर्सला ॲडमिशन घ्या.**

शिक्षण घेत असतानाच आपल्या कंसेप्ट्स अधिक क्लिअर करुन घेण्याचा प्रयत्न करा. इंटर्नशीप, शॉर्ट टर्म वर्क एक्स्पिरियंस सारख्या संधी शोधून त्यांचा उपयोग करा. तिथे मिळालेल्या अनुभवामुळे आपल्याला शेवटच्या वर्षी घ्यावे लागणारे स्पेशल सब्जेक्ट्स निवडताना खूप मदत होते.

**स्टे पॉझिटिव्ह**

वरील प्रत्येक ॲक्टिव्हिटीच्या टप्प्यात स्वतःच्या क्षमतांची नोंद करुन ठेवा. पुढे नोकरीसाठी अशा यादीची प्रचंड मदत होते. एक विचार मनात रुजवा की 'निवड त्याच व्यक्तीची होते, ज्या व्यक्तीला स्वतःमधला **स्पार्क** ठाऊक असून त्यावर विश्वास असतो.'

**ऑल द बेस्ट!!**

Lend-A-Hand India

**लेंड-अ-हँड इंडिया**

९, जीवन विहार हौसिंग सोसायटी, प्राईड पॅनोरमा जवळ, ऑफ सेनापती बापट मार्ग,
पुणे, महाराष्ट्र – ४११ ०१६. दूरध्वनी : (०२०) २५६३ ००९२, ९५५२२ ४१९०५.
E-mail : lahi@lend-a-hand-india.org | www.lend-a-hand-india.org